| जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./५५६५/२०२३ | दिनांक :- ३१/०७/२०२३ |
|---|---|

## प्रसिध्दीपत्रक

दिनांक ०१/०८/२०२३ रोजी मा. पंतप्रधान, भारत सरकार हे पुणे भेटीस येत असून पुणे भेटीचे दरम्यान श्रीमंत दगडुशेठ हलवाई मंदिर, सर परशुरामभाऊ महाविद्यालय (एस.पी. कॉलेज) पुणे व शिवाजीनगर पोलीस मुख्यालय या ठिकाणी कार्यक्रमानिमित्त भेटी देणार आहेत. त्याअनुषंगाने काही रस्त्यांवर सकाळी ०६.०० ते दुपारी १५.०० वा. दरम्यान आवश्यक असेल त्याप्रमाणे थोडया कालावधीकरीता वाहतूक थांबविली जाणार असले बाबत दि. ३०/०७/२०२३ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविण्यात आले होते.

परंतू याबाबत सकाळी ०६.०० ते दुपारी १५.०० वा. पर्यंत काही रस्त्यांवरील वाहतूक पूर्णपणे ९ तास थांबविली जाणार असलेबाबत काही सोशलमिडीयाव्दारे पसरवून विनाकारण नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण केला जात आहे. तरी नागरिकांनी सोशल मिडीयावर प्रसारीत होणा-या मेसेजकडे लक्ष देवू नये.

**याबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.**

- दि. ०१/०८/२०२३ रोजी पुणे शहरातील विविध विकासकामांच्या उद्घाटनाचे कार्यक्रम शहरातील ठिकाणी आयोजित केलेले आहेत. सदर कार्यक्रमांकरीता संरक्षित व अति संरक्षित महोदय उपस्थित राहणार आहेत.
- पुण्यातील नुकत्याच घडून गेलेल्या घटनांची पार्श्वभूमी व सुरक्षेच्या कारणास्तव खबरदारी घेण्यात येईलच परंतू त्याचा ताण वाहतूक व्यवस्थेवर होणार नाही याची दक्षता घेत आहोत. व्ही.व्ही.आय.पी. यांच्या वाहनांचा ताफा ज्या रस्त्यावरुन मार्गस्थ होणार असेल त्यामार्गावर सुरक्षेच्या कारणास्तव आवश्यकतेप्रमाणेच टप्प्या-टप्प्याने कमी कालावधीकरीता वाहतूक नियमन करण्यात येईल.
- यातील कोणताही रस्ता सलगप्रमाणे मोठया कालावधीकरीता बंद करण्यात येणार नाही, तर फार थोड्या कालावधीकरीता वाहतूक थांबविण्यात येईल. इतर वेळी मात्र वाहतूक पूर्ववत असणार आहे.
- कार्यक्रमासाठी निमंत्रीत नागरिकांसाठी वेळेत पोहचण्याकरीता निमंत्रीतांचे वाहनांना कोणताही अडथळा होणार नाही याची वाहतूक पोलीस दक्षता घेणार आहेत, याबाबत सर्व अधिकारी व अंमलदारांना सूचना देण्यात आल्या आहेत.
- मा. व्ही.व्ही.आय.पी. यांचे पुणे शहरातील विविध विकासकामांच्या उद्घाटन कार्यक्रमाकरीता असलेल्या दौ-यादरम्यान पुणे शहरातील शाळा, महाविद्यालये, सर्व आस्थापना, दुकाने, कार्यालये, शासकीय कार्यालये, कंपन्या इ. यांचे कामकाज सुरळीत चालू राहणार आहे.

**तरी सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, वाहतूक बदलाबाबत कोणत्याही अफवांवर किंवा बातम्यांवर विश्वास ठेवू नये व जास्तीत जास्त पर्यायी मार्गाचा वापर करुन वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे.**

31-7-2023

( विजयकुमार मगर )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रत :- सर्व संबंधितांना**

Scanned with OKEN Scanner